-: प्रेस नोट दिनांक- १९/१०/२०२० :-

**शिवाजी हणमंत नेसरकर, वय ४७, जलसंधारण अधिकारी, वर्ग-२ यांनी स्वत:साठी व यशवंत लक्ष्मण थोरात, वय ५५, कार्यकारी अभियंता, वर्ग-१ यांचेसाठी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत....**

---

यातील तक्रारदार युवराज संपतराव घोरपडे, रा. माद्याळ, ता. कागल, जि. कोल्हापूर हे मत्स्य उत्पादनाचा व्यवसाय करीत असुन त्यांनी दि. ०६/०७/२०२० रोजी व दि. १२/१०/२०२० रोजी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कोल्हापूर येथील कार्यालयात जावुन मौजे गवसे व वेळवटटी, ता. आजरा येथील पाझर तलावामध्ये मत्स्य उत्पादनाचा परवाना मिळणेबाबत रितसर अर्ज केले होते. त्याप्रमाणे मत्स्य उत्पादनाचा परवाना देणेसाठी तेथील जलसंधारण अधिकारी नेसरकर यांनी प्रत्येक तलावाचे १५,०००/- रू. प्रमाणे दोन तलावांचे ३०,०००/- रू. द्यावे असे म्हणुन लाचेची मागणी केली होती. त्यापैकी १०,०००/- रू. लाच यापुर्वी स्विकारून उर्वरित २०,०००/- रू. लाचेसाठी तक्रारदार यांचेकडे तगादा लावला होता. उरलेले पैसे मिळालेशिवाय परवाना मिळणार नाही असे सांगितलेने तक्रारदार यांनी मृद व जलसंधारण विभाग, कोल्हापूर कार्यालयाचे जलसंधारण अधिकारी नेसरकर यांचे लाचेच्या मागणीबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दि. १९/१०/२०२० रोजी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे मृद व जलसंधारण विभाग, कोल्हापूर कार्यालयाचे जलसंधारण अधिकारी नेसरकर यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष केली असता, पडताळणीमध्ये जलसंधारण अधिकारी नेसरकर यांनी तक्रारदार यांना गवसे व वेळवट्टी गावचे पाझर तलावामध्ये मत्स्य व्यवसायाचा परवाना देणेसाठी यापुर्वी १०,०००/- रू. लाच स्विकारल्याचे मान्य करून २०,०००/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती १८,०००/- रू. लाचेची मागणी स्वत: साठी व कार्यकारी अभियंता यशवंत थोरात यांचेसाठी केली. तसेच कार्यकारी अभियंता यशवंत थोरात यांची वेगळी पडताळणी केली असता, त्यांनी जलसंधारण अधिकारी नेसरकर यांचे लाचमागणीस दुजोरा दिलेचे निष्पन्न झाले.

यशस्वी पडताळणी कारवाईप्रमाणे मृद व जलसंधारण विभाग, कोल्हापूर कार्यालयमध्ये जलसंधारण अधिकारी नेसरकर व कार्यकारी अभियंता यशवंत थोरात यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित केली असता, जलसंधारण अधिकारी शिवाजी नेसरकर यांनी तक्रारदार यांना गवसे व वेळवट्टी गावचे पाझर तलावामध्ये मत्स्य व्यवसाय्राचा परवाना देणेसाठी स्वत: साठी व कार्यकारी अभियंता यशवंत थोरात यांचेसाठी मागणी केलेप्रमाणे १८,०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचेविरूध्द यशस्वी सापळा कारवाई करणेत आलेली आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी युवराज संपतराव घोरपडे, रा. माद्याळ, ता. कागल, जि. कोल्हापूर यांचे फिर्यादीवरून १. शिवाजी हणमंत नेसरकर, वय ४७, जलसंधारण अधिकारी, वर्ग-२, रा. प्लॉट नं. १५, निवारा कॉलनी, कसबा बावडा, कोल्हापूर, २. यशवंत लक्ष्मण थोरात, वय ५५, कार्यकारी अभियंता, वर्ग-१, सध्या रा. दुधगंगा बंगला, सिंचन भवनजवळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर, मुळ रा. डी-२, गणेश गार्डन, बिबवेवाडी, पुणे ३७, दोघे नेमणुक - मृद व जलसंधारण विभाग, वारणा भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, श्री. जितेंद्र पाटील, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सफौ. संजीव बंबरगेकर, पोहेकॉ शरद पोरे, पोना विकास माने, पोकॉ रुपेश माने व मयुर देसाई, चालक पोहेकॉ विष्णु गुरव, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.